# संपादकीय

"खडतर आणि प्रतिकूल परिस्थितीत संशोधनाचे चालणारे कार्य अव्याहतपणे होत असेल तर ती व्यतयाच्या बाधेवर मात करीत समाज वा देश कात टाकतोय असे म्हटल्या जाते" या अर्थाने भारत कात टाकतोय हे म्हणता येते. संशोधन मानव्यशास्त्रातील असो वा विज्ञानाच्या पातळीवरील त्यात अखंडत्वाचा प्रवाह कायम असलाच पाहिजे. जगभरात प्लेगची साथ आली त्या काळात आणि दोन्ही महायुद्धाच्या गडद छायेच्या काळात संशोधन कार्य थांबले नाही, त्यामुळे नंतरच्या पिढ्यांना तुलनेने प्रगतीकारक जीवन वाट्याला आले. covid-19 ने जगाचे गतीचक्र काही काळाकरिता थांबवले तेव्हाही संशोधन कार्य थबकले की काय? अशी पुसटशी शंका येऊ लागली होती. त्या शंकेवर आरोग्य क्षेत्रातील तज्ञ, मानसशास्त्रातील तज्ञ, अर्थचक्राचे गतीकार यांनी मात करीत विषाणूला पुरून उरत नव्या जीवनाची वहिवाट आश्वस्त केली.

एकूणच जगाच्या प्रतलावर दृष्टिक्षेप टाकला तर त्यातून पूर्णतः सुटका झाली असे चित्र नाही. उलट महाराष्ट्रात विषाणूने दुसऱ्यांदा उसळी मारल्याने गतीचक्राच्या आ-याची गती covid-19 प्रमाणे नाही तरीपण दखलपात्र अशी मंदावली आहे. प्रभावी लसीकरण आल्याने 'मुक्ततेचा प्रवास' सहज साध्य वाटू लागला होता. परंतु परिस्थिती बिकट झाल्याने संशोधनक्षेत्र झाकोळले जाण्याची भिती उद्भवली, मात्र यावरही मात करणारी जी संशोधन क्षितिजे गवसणी घालताना दिसतात त्यात 'नवज्योत'
या संशोधन पत्रिकेचा नामोल्लेख होणे अनेक अर्थांनी संदर्भांकित आहे.

एक म्हणजे वर्षातून चार संशोधन पत्रिका प्रकाशित केल्या जातात. मागील अनेक दशकांपासून विनाखंड संशोधनाला पूर्णतः वाहीलेला आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय पत्रिकेचा प्रवाह अबाधित आणि अखंडित सुरू आहे. covid-19 चा टाळेबंदीच्या काळात ही संशोधन पत्रिका प्रकाशित झाली. प्रकाशक, संशोधकलेखक यांच्या परस्परांवरील विश्वास शिवाय हे शक्य नव्हते. या पत्रिकेचा आधारच 'विश्वासाच्या' मूलभूत प्रमेयावर उभा असल्याने विनाविलंब 'नवज्योत' संशोधन पत्रिका प्रकाशित होत राहिली. महत्त्वाचा दुसरा पैलू म्हणजे समकालीन प्रश्नांवर येणाऱ्या संशोधनलेखांना अग्रक्रम देणे. यावेळेच्या संशोधन पत्रिकेत त्याचे प्रतिबिंब उमटलेले दिसून येते. वर्तमान शेतीविषयक कायदे त्यांची अंमलबजावणी आणि आंदोलनाच्या निमित्ताने शेतीचे ऐरणीवर आलेले प्रश्न यांचा सखोल आढावा शेतीविषयक संशोधन लेखात प्रतिबिंबित झालेला आहे. याच धाग्याला पकडून नवभारताची धुरा सांभाळत देशाची जडणघडण करणारे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या कृषीविषयक धोरणांची समीक्षा करणारे संशोधन लेख विचारप्रवृत्त असे आहेत. शेतीतील दारिद्र्य संपविण्याच्या दृष्टीने नेहरूंनी पुढाकार घेत चालना देऊन बांधलेली धरणे, कालवे अन्नधान्याच्या 'आत्मनिर्भर' तेची दिशा होती. याबाबतची मांडणी संशोधन लेखासोबतच पुणर्रविचाराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. नेहरूत्तोर कालखंडातील कृषीधोरण, त्यांचे परिणाम, यांच्याप्रमाणेच महिलांना संपत्तीत मिळणाऱ्या वारसा हक्काबाबतचा कायदा, त्याचा परिणाम, स्वच्छ भारत अभियान, भारतीय राष्ट्रवाद आणि त्याचे स्वरूप,कोव्हिड नंतरची आव्हाने आणि संधी याबाबत संशोधकांनी लेखनाच्या माध्यमातून केलेली मांडणी संशोधक, अभ्यासक, लेखक, विश्लेषक, चिकित्सक यांच्या दृष्टीने मोलाची आहे. संशोधनपत्रिकेत बहुविध विषयाच्या मांडणी करिता संशोधकांना अवकाश खुला आहे या कारणास्तव संशोधन लेखन होते असे नसून, अल्पावधीत सदर संशोधन पत्रिकेने संशोधनाच्या क्षेत्रात आपली अमीट अशी मुद्रा स्थापित केल्याने नवसंशोधक, प्राध्यापक, लेखक, वैचारिक मांडणी करणारे या सर्वांचा ओढा 'नवज्योत' संशोधन पत्रिकेकडे वळला आहे. हे संशोधन पत्रिका संचालित करणाऱ्यांचे यश होय. पारदर्शकता आणि मूल्यात्मक दर्जा यांच्या आग्रहीपणा मुळे त्यांनी जी प्रतिमा तयार केली त्याचे हे फलित आहे. त्यामुळेच प्रतिकूल स्थितीत संशोधन लेखांचा ओघ कायम राहिला आणि दर्जेदार संशोधन लेख प्रकाशित करता आले.

संशोधन लेखनकर्त्यांना भविष्याच्या वाटचालीकरिता अनेकानेक शुभेच्छा. आपला स्नेह आणि अनुबंध 'नवज्योत' सोबतच नेहमीच जुळलेला असावा या मनोकामनेसह शुभेच्छा.

आमचे परमस्नेही डॉ. रवींद्र भणगे यांनी या संशोधन पत्रिकेकरीता संपादकीय लिखाणाचा नेहमीप्रमाणेच विश्वास दाखविला त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो आणि त्यांच्या स्नेहमयी सहवासात राहू इच्छितो.

धन्यवाद.

आपला स्नेही

**संदीप तुंडूरवार**
सहयोगी प्राध्यापक,
पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर